चाणक्य मंडल परिवार

# MPSC

# प्रचलित घडामोडी

## *स्पेशल कोर्स (मराठी)*

Headlines: २२ सप्टेंबर ते २९ सप्टेंबर २०१९

३० सप्टेंबर २०१९



# हेडलाईन्स

## महाराष्ट्रात निवडणूकीचे बिगुल वाजले : आचारसंहिता लागू

- महाराष्ट्र राज्यात विधानसभा निवडणूकांच्या तारखा जाहीर झाल्या असून 12 सप्टेंबरपासून आचारसंहिता लागू करण्यात आली आहे.
- सर्व राजकीय पक्षांनी सन 1968 मध्ये आदर्श आचारसंहितेस मान्यता दिली.
- आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी सर्वप्रथम 1991 मध्ये पार पडली.

**भारतीय निवडणूक आयोगाची आदर्श आचारसंहिता**

- भारतात 'भारतीय निवडणूक आयोगाची आदर्श आचारसंहिता' किंवा सामान्यपणे निवडणूकीची आचारसंहिता असे संबोधले जाते.
- आचारसंहिता निवडणूक प्रक्रिया सुरू झाल्यापासून म्हणजे एखाद्या क्षेत्राची निवडणूक घोषित झाल्यापासून निवडणूक संपून निकाल बाहेर येईपर्यंत लागू असते.
- या आचार संहितेत विविध राजकीय पक्षांनी कशा प्रकारची वर्तणूक ठेवायची याचे विवरण आहे.
- या आचारसंहितेचे पालन सर्व राजकीय पक्षांना तसेच उमेदवारांना बंधनकारक असते.
- निवडणूकीत सामिल मान्यताप्राप्त अथवा अमान्यताप्राप्त राजकीय पक्षांना अथवा अपक्ष/स्वतंत्र उमेदवारांनी भाषण, मतदानाचा दिवस, मतदान केंद्र, निवडणुकीचा जाहिरनामा, मिरवणुका, प्रचार, घोषणा व सर्वसामान्य व्यवहार यात काय मर्यादा पाळाव्यात याचे विवेचन केले आहे.
- आचारसंहिता ही निवडणुका मुक्त आणि योग्य वातावरणात पार पडाव्यात, त्यात काही जातीय दंगेधोपे अथवा कोणत्याही स्वरूपाचे गैरव्यवहार होऊ नयेत या उद्देशाने तयार करण्यात आली आहे.

**पक्षांतर बंदी कायदा :**

- 52 वी घटनादुरुस्ती अधिनियम, 1985 अन्वये एक पक्ष सोडून दुसऱ्या पक्षात गेल्याबद्दल संसद आणि राज्य विधीमंडळाचे सदस्य अपात्र ठरतात, अशी तरतूद करण्यात आली. घटनेमध्ये याबाबतचे 10 वे परिशिष्ट नव्याने समाविष्ट करण्यात आले.
- 91 वी घटनादुरुस्ती अधिनियम, 2003 अनुसार परिशिष्ट 10 मधील तरतुदीत, एक बदल करण्यात आला.
- या अन्वये पक्षांतरावर आधारित अपात्रता ही पक्षफुटीला लागू न करण्याची अपवादात्मक तरतूद वगळण्यात आली.

**पक्षांतरविरोधी कायद्यातील तरतूदी :**

- राजकीय पक्षांचे सदस्य : एखाद्या सभागृहाचा कोणत्याही पक्षाचा एखादा सदस्य हा संबंधीत सभागृहाचा सदस्य म्हणून अपात्र ठरतो.
  - (अ) जर त्याने स्वेच्छेने राजकीय पक्षाचे सदस्यत्व सोडले
  - (ब) जर त्याने त्याच्या राजकीय पक्षाच्या आदेशाविरुद्ध पक्षाची परवानगी न घेता गृहामध्ये मतदान केले किंवा मतदानात भाग घेतला नाही आणि अशा कृतीला त्याच्या पक्षाने 15 दिवसांत माफी दिली नाही.
- स्वतंत्र उमेदवार : अपक्ष निवडून आलेल्या सदस्याने कोणत्याही राजकीय पक्षात प्रवेश केल्यास तो गृहाचा सदस्य राहण्यास अपात्र ठरतो.
- नामनिर्देशित सदस्याने सभागृहात पदग्रहण केल्यानंतर सहा महिन्यांच्या कालवधीनंतर कोणत्याही राजकीय पक्षात प्रवेश घेतला तर तो सदस्य म्हणून अपात्र ठरतो.
- पक्षांतर केल्यामुळे अपात्रतेसंबंधित सर्व प्रश्नांवर सभागृहाचा अध्यक्ष निर्णय देईल.

**अपवाद :**

- जर एक पक्ष दुसऱ्या पक्षात विलीन झाल्यामुळे एखादा सदस्य मूळ पक्षाबाहेर गेला असेल, तर एखाद्या पक्षातील तर पक्षातील दोन-तृतीयांश सदस्यांनी दुसऱ्या पक्षात विलीन होण्यास सहमती दर्शविली असेल तरच विलीनीकरण घडून येते.
- एखादा सदस्य सभागृहाचा अध्यक्ष म्हणून निवडून आल्यावर जेव्हा तो स्वेच्छेने पक्षाचे सदस्यत्व सोडतो किंवा त्या पदावरून मुक्त झाल्यावर पक्षात पुनर्प्रवेश घेतो, तेव्हा या पदाची प्रतिष्ठा आणि निष्पक्षपातीपणा विचारात घेऊन या सवलतीची तरतूद केली आहे.

## राष्ट्रीय एकता पुरस्कार

- भारताचे लोहपुरुष सरदार पटेल यांच्या 144 व्या जयंतीनिमित्त केंद्र सरकारने या वर्षीपासून राष्ट्रीय एकता पुरस्कार देत असल्याचे जाहीर केले.
- स्वातंत्र्यावेळी भारतास एकसंध ठेवण्यात सरदार पटेलांनी जे योगदान दिले त्याच्या सन्मानार्थ हा पुरस्कार दिला जाईल.
- व्यक्ती व संस्थांना राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने केलेल्या कामाबद्दल दिल्या जाणार

**एकता पुरस्कार कोणाला व कशासाठी ?**

- राष्ट्रीय एकता पुरस्कार एखाद्या व्यक्तीला किंवा संस्थेला राष्ट्रीय ऐक्यासाठी देण्यात येईल.
- पुरस्कार वर्षातून जास्तीत जास्त तीनच व्यक्ती / संस्था यांना देण्यात येईल.

**पुरस्काराचे स्वरूप :**

- हा पुरस्कार चांदी व सोन्याचा बनलेला असून कमळाच्या पानाप्रमाणे त्याचा आकार असेल. त्याच्या पुढील बाजूस पटेल यांचे चित्र असेल. पुरस्कारात कसल्याही रकमेची तरतूद नाही.

**सरदार वल्लभभाई पटेलांविषयी :**

- जन्म : 31 ऑक्टोबर 1875.
- मृत्यू : 15 डिसेंबर 1950.
- ते स्वतंत्र भारताचे पहिले गृहमंत्री होत.
- 31 ऑक्टोबर : राष्ट्रीय एकता दिन.
- गुजरातमध्ये सरदार पटेलांचा 182 मीटर जगातील सर्वात उंच पुतळा आहे.

## महानायकास दादासाहेब फाळके पुरस्कार

- चित्रपटसृष्टीतील भारतातील सर्वोच्च दादासाहेब फाळके पुरस्कार हा अमिताभ बच्चन यांना जाहीर झाला.
- सिनेसृष्टीतील बहुमुल्य योगदानासाठी दरवर्षी देण्यात येतो.

**पुरस्काराचे स्वरूप :**

- सुरुवात : 1969.
- सुवर्णकमळ व 10 लाख रुपये.
- पहिली पुरस्कार प्राप्त व्यक्ती : देविका राणी.
- हा पुरस्कार भारताच्या माहिती व नभोवाणी खात्यातर्फे दिला जातो.

**दादासाहेब फाळके :**

- भारतातील पहिला चित्रपट 'राजा हरिश्चंद्र' (1913) हा त्यांनी बनविला होता.
- चित्रपटसृष्टीत अमुल्य योगदान.

**अमिताभ बच्चन :**

- पहिला चित्रपट : सात हिंदुस्तानी.
- 2001 चा पद्मभूषण पुरस्कार.
- 2019 : दादासाहेब फाळके पुरस्कार मिळविणारे ते 50 वे व्यक्ती होत.

## सुप्रीम कोर्टात आता 34 न्यायाधीश

- सरन्यायाधीश रंजन गोगोई यांनी नवीन 4 न्यायाधीशांना शपथ दिली.
- त्यामुळे सध्या सुप्रीम कोर्टातील न्यायाधीश संख्या 34 झाली.
- पूर्वीची संख्या : 31 (30 न्यायाधीश + 1 सरन्यायाधीश)
- सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमने या पदांची शिफारस केंद्राकडे केली होती.

**नवीन नियुक्त झालेले न्यायाधीश व त्यांचे पुर्वीचे न्यायालय :**

- कृष्ण मुरारी : पंजाब-हरियाणा, उच्च न्यायालय
- एस. रवींद्र भट : राजस्थान, उच्च न्यायालय
- व्ही. सुब्रमण्यम : हिमाचल प्रदेश, उच्च न्यायालय
- ऋषिकेश रॉय : केरळ, उच्च न्यायालय

**महत्त्वाचे :**

- 1950 मध्ये न्यायालय स्थापनेवेळी सुप्रीम कोर्टातील न्यायाधीशांची संख्या ही 8 (7 + 1) होती. 1956 ला 11 केली गेली. क्रमाक्रमाने वाढवत नेऊन ती यापूर्वी 2008 साली 31 (30 + 1) करण्यात आली.
- न्यायाधीशांच्या नियुक्तीसाठी 99 व्या घटनादुरुस्तीद्वारे 2014 साली NJAC (National Judiciary Appointments Commission) स्थापन करण्यात आले होते. परंतु, 2015 साली ही घटनादुरुस्ती घटनाबाह्य ठरवली गेली.
- सध्या कॉलेजियम पद्धतीनुसार न्यायाधीशांची नियुक्ती केली जाते.

**तिसरा न्यायाधीश खटला (1998) :**

- यानुसार, मुख्य न्यायाधीशांचा सल्ला हा केवळ त्यांचा नसून तो न्यायाधीशांचे बहुमत या तत्त्वावर सर्वोच्च न्यायालयाच्या 4 ज्येष्ठतम न्यायमूर्तींच्या कॉलेजियमचे

बहुमत घेऊनच नियुक्तीचा सल्ला देण्यात येईल.

## इंटरनेट मिळवणे हा मूलभूत हक्क: केरळ उच्च न्यायालय

- इंटरनेट ची उपलब्धता हा घटनेच्या कलम 21 अन्वये शिक्षणाचा मूलभूत हक्क तसेच गोपीनीयतेच्या अधिकाराचा भाग असल्याचा निर्णय 19 सप्टेंबर 2019 रोजी केरळ उच्च न्यायालयाने दिला
- शिस्तीची अंमलबजावणी करणे याचा अर्थ विद्यार्थ्यांचे ज्ञान मिळवण्याचे मार्ग अडवून ठेवणे असे होत नाही
- इंटरनेटची उपलब्धता हा मूलभूत हक्क घोषित करणारे केरळ हे पहिले राज्य ठरले.

## सप्टेंबर महिना : 'राष्ट्रीय पोषण महिना'

- 2019 पासून 1 सप्टेंबर ते 30 सप्टेंबर हा संपूर्ण महिना 'राष्ट्रीय पोषण महिना' म्हणून साजरा केला जाणार, अशी घोषणा नरेंद्र मोदींनी केली.
- हा पोषण अभियानाचाच एक भाग आहे.
- 2019 ची थीम : पूरक आहार (Complementary Feeding)
- उद्देश : माता व बालके सुदृढ रहावी.
- लहान मुलांमधील कुपोषणाचे प्रमाण कमी करणे.

**पोषण अभियान :**

- POSHAN : Pradhanmantri's Overreaching Scheme for Holistic Nourishment.
- सुरुवात : मार्च 2018 (पंतप्रधान मोदींच्या हस्ते)
- ठिकाण : झुंझूनू, राजस्थान
- उद्देश : 2022 पर्यंत कुपोषणाचे निर्मूलन करणे.
- 6 वर्षांपर्यंतची मुले, पौगंडावस्थेतील मुली, गर्भवती महिला आणि स्तनपान करणारी माता यांच्या आहाराच्या पौष्टिकतेत सुधारणा करणे.
- नोडल मंत्रालय : महिला व बालविकास मंत्रालय.

## 'टिक्की मॉसी' या योजनेचा ओडिसा आणि युनिसेफतर्फे शुभारंभ

- मुले व महिलांच्या पोषणाविषयी जागृती करण्याच्या उद्देशाने ओडिसा सरकारच्या महिला व बालविकास मंत्रालयाने संयुक्त राष्ट्र बाल आपातकालीन निधी (UNICEF) च्या मदतीन 'टिक्की मॉसी' या योजनेचे अनावरण केले.
- राज्य सरकारने महिला व मुले हे सर्व कल्याणकारी कार्यक्रमात मुख्य आहेत यावर प्रकाश टाकला.

**या योजनेचा उद्देश :**

- सामान्य लोकांचे विचार, वागणे बदलले पाहिजे आणि प्रत्येत घरात मुलाचे व स्त्रीचे पोषण आणि त्यांचा विकार याबाबत जागरूकता निर्माण व्हायला हवी.
- राज्यातील मुलांच्या चांगल्या भविष्यासाठी महिला आणि बालकांसाठी राज्य सरकारच्या योजनांची योग्य माहिती प्रत्येक घरात पुरविण्याबाबत आणि त्यायोगे मुलांच्या चांगल्या आरोग्याची आणि विकासासाठी जनजागृतीदेखील या कार्यक्रमाद्वारे केली जाईल.
- नुकताच केंद्र सरकारने सप्टेंबर महिना 'राष्ट्रीय पोषण महिना' म्हणून घोषित केला आहे.

## संयुक्त राष्ट्रसंघाचा इंटरनॅशनल मायग्रंट स्टॉक रिपोर्ट – 2019

- या अहवालात आंतरराष्ट्रीय पातळीवर होणाऱ्या स्थलांतरणाविषयी माहिती देण्यात आली आहे.
- आंतरराष्ट्रीय पातळीवर भारतीय वंशाच्या लोकांनी सर्वाधिक स्थलांतर केल्याचे दिसून आले आहे.
- एकूण 17.5 दशलक्ष भारतीय वंशाचे नागरिक परदेशात वास्तव्यास आहेत.
- या संस्थेच्या अहवालात भारत प्रथम तर मेक्सिको (11.8), चीन (10.7) व रशिया (10.5) यांचा अनुक्रमे द्वितीय, तृतीय व चौथ्या क्रमांकावर आहेत. [वरील आकडे दशलक्षमध्ये आहेत.]

**अहवालातील महत्त्वाच्या बाबी :**

- जागतिक पातळीवर स्थलांतरितांची संख्या सुमारे 272 दशलक्ष आहे.
- सध्या भारतात 5.1 दशलक्ष परदेशी लोक आहेत.
- भारतात बांगलादेश, पाकिस्तान आणि नेपाळ या देशांतून सर्वाधिक लोक आले आहेत.
- प्रादेशिकदृष्ट्या युरोपमध्ये आंतरराष्ट्रीय स्थलांतरितांचे प्रमाण सर्वाधिक आहे. यानंतर उत्तर अमेरिका, उत्तर आफ्रिका, पश्चिम आशिया या प्रदेशांचा क्रमांक लागतो.

- आंतरराष्ट्रीय स्थलांतरितांपैकी सर्वाधिक लोक अमेरिकेची संयुक्त संस्थाने (USA) येथे वास्तव्यास आहेत. यानंतर जर्मनी व सौदी अरेबिया या दोन देशांचा क्रमांक लागतो.
- निर्वासित व आश्रय शोधणाऱ्या जागतिक लोकसंख्येपैकी 46% लोक उत्तर आफ्रिका व पश्चिम आशियात आहेत.

**स्थलांतर म्हणजे काय?**

लोकांचे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी कायम किंवा तात्पुरते राहण्याच्या उद्देशाने झालेले स्थानांतर म्हणजेच स्थलांतर होय.

- भारतात NSSO च्या अहवालानुसार –
  1) ग्रामीण – ग्रामीण
  2) ग्रामीण – शहरी
  3) शहरी – शहरी
  4) शहरी – ग्रामीण

  असे उतरत्या क्रमाने स्थलांतर होते.
- भारतात सर्वाधिक स्थलांतरित लोकसंख्या उत्तर प्रदेशात व त्याखालोखाल महाराष्ट्रात आहे.
- देशभरातील अंदाजे 40% लोकसंख्या स्थलांतरित आहे. यापैकी 85% राज्यांतर्गत तर 15% आंतरराज्यीय स्थलांतरणात समाविष्ट आहे.
- महाराष्ट्रातील दर 1000 स्थलांतरितामागे 163 परप्रांतीय असतात.
- भारतातील ग्रामीण ते शहरी स्थलांतर उतरत्या क्रमाने –
  1) उत्तरप्रदेश – दिल्ली
  2) बिहार – दिल्ली
  3) उत्तरप्रदेश – महाराष्ट्र

## KCST– Kalam Centre for Science and Technology

- डीआरडीओ (संरक्षण संशोधन व विकास संघटना) आणि केंद्रीय जम्मू विद्यापीठ (CUJ) यांमधील सामंजस्य करारानुसार (MoU) KCST ची स्थापना करण्यात आली.
- जम्मू आणि काश्मीर भागात विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात संशोधन व नवे शास्त्रज्ञ तयार करण्यासाठी कलाम विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र स्थापन करण्यात येणार आहे

**केंद्रीय जम्मू विद्यापीठ:**

- केंद्रीय विद्यापीठ कायदा 2009 नुसार स्थापन झालेले हे एक केंद्र अनूशासित विद्यापीठ आहे

**DRDO :**

- Defence Research Development Organization
- स्थापना: 1958
- मुख्यालय: न्यू दिल्ली
- ब्रीदवाक्य : बलस्य मूल विज्ञानम्
- अध्यक्ष: जी. सतीश रेड्डी.

## TB हारेगा, देश जितेगा अभियान

- 25 सप्टेंबर रोजी आरोग्य व कुटुंब मंत्रालयाने हे अभियान सुरू केले आहे.
- लक्ष्य: 2022 पर्यंत क्षयरोगासंबंधी सर्व सेवा संपूर्ण देशात उपलब्ध करून देणे
- 2025 पर्यंत भारतातून TB या रोगाचे समूळ उच्चाटन करणे
- 2030 पर्यंत संयुक्त राष्ट्राने जगातून TB या रोगाचे समूळ उच्चाटन करण्याचे लक्ष्य ठेवले आहे.

**क्षयरोग (TB):**

- जिवाणूंपासून होणारा रोग
- हा संसर्गजन्य आजार असून तो 'मायक्रोबॅक्टेरियम ट्युबरक्युलोसिस' या जिवाणूमुळे होतो.
- या जिवाणूचा शोध सर रॉबर्ड कॉक यांनी 24 मार्च 1882 रोजी लावला म्हणून 'कॉक्स इन्फेक्शन' असेही म्हणतात.
- जागतिक क्षयरोग दिन 24 मार्च रोजी साजरा करण्यात येतो.
- क्षयरोगचा प्रसार हवेमार्फत (रुग्णाच्या खोकण्याने, शिकण्याने) होतो.
- क्षयरोगाचे जंतू मुख्यतः फुप्फुसावर परिणाम करतात म्हणून फुप्फुसाच्या क्षयरोगाचे प्रमाण सर्वात जास्त आहे.

## युद्ध सराव

### 1. भारत–कझाकिस्तान युद्ध सराव : KAZIND 2019

- 2 ते 15 ऑक्टोबर 2019 च्या दरम्यान पिथौरगढ येथे आयोजित केला जाणार.

**2. भारत–अमेरिकादरम्यान व्याघ्र विजय युद्ध सराव**

- हा सराव तिन्ही दलांचा मिळून असेल.
- नोव्हेंबरमध्ये आयोजित केला जाणार.
- विशाखापट्टणम आणि काकीनाडा येथे आयोजित.

## दिनविशेष

## 27 सप्टेंबर : जागतिक पर्यटन दिवस

- सुरुवात : 1980.
- 2019 ची थीम : 'पर्यटन आणि नोकऱ्या : सर्वांसाठी चांगले भविष्य'.
- 27 सप्टेंबर हा दिवस 'जागतिक पर्यटन दिन'म्हणून साजरा केला जातो.
- संयुक्त राष्ट्राच्या जागतिक पर्यटन संस्थेची (UNWTO) स्थापना 27 सप्टेंबर 1970 मध्ये या दिवशी झाली होती. म्हणून हा दिवस जागतिक पर्यटन दिवस म्हणून साजरा केला जातो.

**भारत आणि आंतरराष्ट्रीय पर्यटन :**

- भारताचा जागतिक पर्यटनातील हिस्सा : 0.64%
- भारतात येणाऱ्या पर्यटकांचे प्रमाण : 30.3%
- महाराष्ट्रात आलेल्या परदेशी पर्यटकांचे प्रमाण : 20.8%
- सर्वाधिक परदेशी पर्यटक अमेरिकेतून : 15.58%

# एक देश एक भाषा : योग्य की अयोग्य

14 सप्टेंबर म्हणजे हिंदी भाषा दिनानिमित्त नवी दिल्ली येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना भारताच्या माननीय गृहमंत्र्यांनी 'एक भाषा, एक राष्ट्र' हा विचार बोलून दाखविला. दक्षिणेतील राज्यांनी याला कडाडून विरोध केला. महाराष्ट्र, पश्चिम बंगाल या राज्यांतूनही विरोधाचा सुर उमटला. आमची भाषा, आमचा अधिकार असून तुम्ही कोण, असा थेट सवाल जनतेने शासनाला केला आहे.

पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भारताचे वर्णन करताना 'विविधता मे एकता' अशा शब्दांत केले आहे. विविधतेत या देशाची एकता आहे, हे सांगताना प्रत्येक भारतीयाला गर्व वाटतो. युरोपातल्या अनेक देशांची अशी भावना आहे की, एका भाषेशिवाय राष्ट्राची संकल्पना पूर्णत्वास जात नाही. परंतु भारतात झालेल्या स्वातंत्र्य चळवळीने ही धारणा फोल ठरवली. या चळवळीने हे अधोरेखित केले की, भारताच्या राष्ट्रीय एकतेसाठी भाषिक आणि सांस्कृतिक विविधता आवश्यक आहे.

लोकसंख्येचा विचार करता, देशात सर्वाधिक म्हणजे 43% पेक्षा जास्त लोक हिंदी भाषा बोलतात. त्यानंतर बंगाली भाषा बोलणाऱ्यांची संख्या 8% पेक्षा जास्त तर मराठी व तेलगु बोलणाऱ्यांची संख्या देशात 6% अधिक आहे. तमिळ, गुजराती, उर्दू, कन्नड, उडीया, पंजाबी ह्या भाषा बोलणाऱ्या लोकांची संख्या 3 ते 5.5% आहे. वरकरणी पाहता असे वाटते की भारतातील बहुतांश लोक हिंदी बोलतात, तरिही हिंदीला राष्ट्रीय भाषेचा दर्जा देण्यासाठी विरोध का?

संविधानातील तरतुदीचा विचार केल्यास भारताची अधिकृत अशी कोणतीही भाषा नाही. सर्व राज्यांना त्यांच्या प्रांतापुरती त्यांची त्यांची अधिकृत भाषा निवडण्याचा अधिकार घटनेने दिला आहे. भारतीय संविधानाच्या कलम 345 अन्वये राज्य विधान मंडळे त्यांच्या राज्यांसाठी एक किंवा एकापेक्षा जास्त किंवा हिंदी भाषेला राज्याची अधिकृत भाषा म्हणून मान्यता देऊ शकतात.

तत्पूर्वी, स्वातंत्र्योत्तर काळात, पंडित जवाहरलाल नेहरू, तसेच सरदार वल्लभभाई पटेल यांचा भाषिक प्रजासत्ताकास विरोध होता. परंतु मुख्यतः दक्षिणेकडील राज्यातील होणाऱ्या मागणीचा विचार करण्यासाठी भारत सरकारने एस. के. धार यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीने भाषावार प्रांतरचनेस विरोध दर्शविला. यानंतर लगेचच, डिसेंबर 1948 मध्ये पंडित नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल आणि पट्टाभी सितारामय्या यांची जेव्हीपी समिती स्थापन करण्यात आली. या समितीनेसुद्धा भाषावार विभाजनाला विरोध केला. परंतु 1952 मध्ये तेलगु भाषिक पी. श्रीरामुलू यांनी उपोषण केले आणि त्यात त्यांचे निधन झाले. यामुळे भाषिक वाद उफाळून आला आणि ऑक्टोबर 1953 मध्ये पहिले भाषेवर आधारित राज्य 'आंध्रप्रदेश' अस्तित्वात आले. पुढे डिसेंबर 1953 मध्ये फझल अली समिती नेमण्यात आली. या समितीने भाषावार प्रांतरचनेस मंजुरी दिली व वेगवेगळ्या स्थानिक भाषेवर आधारीत राज्ये उदयास आली.

**अधिकृत भाषासंबंधातील संविधानिक कलमे आणि कायदे :**

- **कलम 29 :** भारतात राहणाऱ्या कोणत्याही समुदायास आपली भाषा व संस्कृती जपण्याचा मुलभूत अधिकार आहे.
- **भाग 17 : कलम 343**
- **कलम 343 :** हिंदी ही केंद्र सरकारची कामकाजाची भाषा असेल, तसेच संविधान स्वीकारल्यानंतर 15 वर्षांपर्यंत इंग्रजी सुद्धा केंद्र सरकारच्या सर्व कामकाजामध्ये वापरली जाईल. संसद या 15 वर्षांनंतरही इंग्रजीच्या अधिकृत कामकाजाच्या भाषेसंबंधी कायदा करू शकते.
- यानंतर संसदेने कार्यालयीन भाषा कायदा 1963 पारीत केला आणि या कायद्यान्वये हिंदी आणि इंग्रजी अनियमित कालावधीसाठी केंद्र सरकारच्या अधिकृत भाषा म्हणून वापरल्या जातील.
- **कलम 345 :** राज्यांना आपल्या मतानुरूप त्यांची संबंधीत राज्यभाषा, विधानसभेत अधिकृत भाषा म्हणून वापरता येते.
- कार्यालयीन भाषा कायदा 1963 कायद्यान्वये,

केंद्र सरकार आणि बिगर हिंदी भाषिक राज्यांतील संवादासाठी इंग्रजी भाषेचा उपयोग केला जाईल.

- **कलम 348 :** सर्वोच्च व उच्च न्यायालयाची अधिकृत भाषा ही इंग्रजी असेल. तसेच राज्यपाल, राष्ट्रपतींच्या पूर्व संमतीने, हिंदी किंवा अन्य राज्यभाषेला उच्च न्यायालयाची कामकाजाची भाषा म्हणून मान्यता देऊ शकतात.
- **परिशिष्ट 8 :** संविधानातील 8 व्या परिशिष्टात एकूण 22 भाषांचा समावेश करण्यात आला आहे. या सर्व भाषांना समान दर्जा देण्यात आला आहे. सुरुवातीला या परिशिष्टामध्ये 14 भाषांचा समावेश होता. त्यानंतर 21 व्या घटनादुरुस्ती कायदा 1967 अन्वये सिंधी, 71 व्या घटनादुरुस्ती कायदा 1992 अन्वये कोंकणी, मणिपूरी, नेपाळी; 92 व्या घटनादुरुस्ती कायदा 2003 अन्वये बोडो, डोंगरी, मैथिली, संथाली या भाषांचा समावेश करण्यात आला.
- **कलम 210 :** या कलमान्वये एखाद्या सदस्यास विधानसभेत हिंदी, इंग्रजी आणि राज्याची अधिकृत भाषा, अध्यक्षांच्या परवानगीशिवाय वापरता येते. इतर भाषांच्या बाबतीत अध्यक्षांची परवानगी घ्यावी लागते.
- आज भारतभर भाषा त्रिसूत्री अस्तित्वात आहे. या सुत्रातही हिंदी, इंग्रजी व राज्यातील कुठलीही एक भाषा असू शकते. इथेही हिंदीची सक्ती करण्यात आलेली नाही.

वरील कायदे आणि कलमे बघता हिंदीची सक्ती कुठेही करण्यात आलेली नाही. कोणत्याही गोष्टीची सक्ती केली की ते जनतेला आवडत नाही. हिंदी भाषा शिका म्हणून सरकारने बिगर हिंदी प्रदेशात मोहीम चालवली तर लोक त्याचे स्वागतच करतील. हिंदी भाषेचा आजही कोणाचा विरोध नाही. विरोध आहे तो हिंदी भाषेच्या सक्तीला! हिंदी भाषा हे मोठ्या देशातील एक प्रमुख संवादाचे माध्यम आहे. ते लोकांनीही स्विकारले आहे. राजधानी दिल्लीत तसेच आर्थिक राजधानी मुंबईत सर्व भाषा बोलणारे लोक राहतात. त्या सर्वांना संवादाने जोडणारी एकमेव भाषा म्हणजे हिंदी. पण हिंदी भाषा राष्ट्रीय भाषा म्हणून लादण्याचा प्रयत्न झाला तर दक्षिणेतील तसेच इतर अनेक राज्यातील लोकांकडून त्याला विरोध झाल्यास आश्चर्य वाटू नये. तेव्हा हिंदी भाषेची सक्ती न करता तिला संवादाची भाषा म्हणून लोकांसमोर आणावे.

**महत्त्वाची माहिती :**

राज्य पुर्नरचना कायदा 1956 अस्तित्वात आल्यानंतरही भारताच्या नकाशात भरपूर बदल झाले आहेत. यातील महत्त्वाचा बदल म्हणजे नवीन राज्यांची निर्मिती. बहुतांश राज्ये ही भाषेच्या आधारावर विभागली गेली आहेत. कालानुक्रमे ही राज्ये पुढीलप्रमाणे :

- 1960 पूर्वी भारतात 14 राज्ये अस्तित्वात होती.
- 14 वे राज्य : महाराष्ट्र.
- 15 वे राज्य : गुजरात (1960)
- 16 वे राज्य : नागालँड (1963)
- 17 वे राज्य : हरयाणा (1966)
- 18 वे राज्य : हिमाचल प्रदेश (1971)
- 19 वे राज्य : मणिपूर (1972)
- 20 वे राज्य : त्रिपूरा (1972)
- 21 वे राज्य : मेघालया (1972)
- 22 वे राज्य : सिक्किम (1975)
- 23 वे राज्य : मिझोराम (1987)
- 24 वे राज्य : अरुणाचल प्रदेश (1987)
- 25 वे राज्य : गोवा (1987)
- 26 वे राज्य : छत्तीसगढ (2000)
- 27 वे राज्य : उत्तराखंड (2000)
- 28 वे राज्य :मध्यप्रदेश (2000)
- 29 वे राज्य : तेलंगणा (2014)